नि. दि. दावा क्र. ३८०-२०२३
निशाण क्र.८७ ची पुरवणी

**वादी साक्षीदार क्र.१ यांची उलटतपासणी प्रतिवादी क्र. १ तर्फे वकील श्री. एम.बी.कांबळे यांचे तर्फे शपथेवर सुरु –**

प्रतिवादी क्र. १ व त्यांचे विधिज्ञांना वारंवापर पुकारले असता गैरहजर, करिता उलटतपास नाही.

**वादी साक्षीदार क्र.१ यांची उलटतपासणी प्रतिवादी क्र. २ तर्फे वकील श्री. के.एस.मांगले यांचे तर्फे शपथेवर सुरु –**

मी पदवीधर आहे. माझा व्यवसाय शेती व इलेक्ट्रीशिअन आहे. मला वडीलोपार्जित मिळकत चार एकर आहे. माझे मुळ गांव अगळगांव, ता. बार्शी हे आहे. तेथे मला चार एकर क्षेत्र आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडीलांनी मौजे केम येथे सेवा केलेली आहे. केम–मलवडी या मधील अंतर ६ ते ७ कि.मी. आहे. माझे वडील सन २००६ मध्ये सेवानिवृत्त झाले. वादग्रस्त मिळकत माझे वडीलांनी दि. ११–०३–१९९१ रोजी कायम खुश खरेदी ४० हजार रुपये मध्ये केलेली आहे. वादमिळकतीच्या पुर्वेस गट नं. ३०८/२, पश्चिमेस गट नं. ३०७, दक्षिणेस गट नं. ३०३/४ व ३०३/३ तर उत्तरेस गट नं. ३०६/२ अशा चतु:सिमा आहेत. हे म्हणणे खरे नाही की, पुराव्याच्या शपथपत्रातील मिळकतीच्या चुत:सिमा चुकीच्या आहेत.

हे म्हणणे खरे नाही की, गट नं. ३०६/३/ड मधील मिळकत प्रतिवादी क्र. २ याची वडीलार्जित मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादग्रस्त मिळकत भिमराव बादल यांनी विश्वनाथ कोरे यांना सन १९८५ साली विक्री केलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर मिळकत विश्वनाथ कोरे यांनी भिमराव बादल यांना सन १९८९ साली पुन्हा खरेदी दिली. हे म्हणणे खरे आहे की, तेच क्षेत्र आम्ही दि. ११/०३/१९९१ रोजी खरेदी केले. हे म्हणणे खरे नाही की, दि. ११–०३–१९९१ रोजीचे माझे वडीलांना प्रतिवादीचे वडीलांनी रकमेला तारण म्हणुन दस्त करुन दिलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, भिमराव बादल हयात असे पर्यंत त्या क्षेत्राची वहिवाट त्यांनीच केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादग्रस्त मिळकत माझे भावाचे नावे खरेदी केली त्यावेळी माझा भाऊ अज्ञान होता. ज्यावेळी वादग्रस्त मिळकत माझे वडीलांनी भावाचे नावे खरेदी केली त्यावेळी माझे भावाचे वय १२ वर्षाचे आसपास

असेल. हे म्हणणे खरे नाही की, आमचा सावकारकीचा व्यवसाय होता. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे क्षेत्र हे माझे भावाचे नावे पैशास तारण म्हणुन करण्यात आले होते व माझा भाऊ म्हणत होता की, ते क्षेत्र परत करुन द्या. हे म्हणणे खरे नाही की, माझा भाऊ निलेश गिराम यांनी माझे वडीलास सदरचे क्षेत्र पलटून करावे म्हणुन विषारी औषद प्राशन करुन आत्महत्या केली. हे म्हणणे खरे नाही की, भिमराव बादल मयत झालेनंतर त्या क्षेत्राची वहिवाट रामेश्वर बादल हे करत आलेले आहेत.

हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ यांनी माझे वडीलांविरोधात सहाय्यक निबंधक करमाळा यांचेकडे सावकारी बाबत तक्रार केलेली होती. हे म्हणणे खरे नाही की, सहाय्यक निबंधक यांनी त्या प्रकरणात मी व माझे वडील खाजगी सावकारी करत असलेबाबत अहवाल दिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी या न्यायालयात माझे आई–वडीलांविरोधात वाटपाचा दावा दाखल केलेला आहे. मी या दाव्यात वडीलार्जित मिळकती समाविष्ठ केलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, याच न्यायालयात प्रतिवादी क्र. २ यांनी वाटपाचा दावा दाखल केलेला असून त्यामध्ये मी प्रतिवादी केले आहे. हे म्हणणे खरेह आहे की, सदर दाव्यामध्ये तात्पुरता मनाईचा अर्ज मंजूर केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त मिळकतीचे खरेदी करतेवेळी वाटप झालेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, वादग्रस्त मिळकतीचे खरेदी वेळी गट विभाजन झालेले नव्हते. हे मला माहिती नाही की, वादग्रस्त मिळकतीचे गट विभाजन करतेवेळी संबंधित गट धारकांची संमती घेतली होती किंवा कसे. सदरचे गट विभाजन मी सज्ञान झालेनंतर झालेले आहे.

हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. २ हे तिचे हिस्सेचे वादग्रस्त मिळकतीतील क्षेत्र आज पर्यंत वहिवाट करत आलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे राहण्याचे ठिकाण केम हे असलेमुळे मी वादग्रस्त मिळकती मध्ये जावून वहिवाट केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दाव्यास नमुद केलेल्या कारणाच्या दिवशी म्हणजेच दि. १४/११/२०२१ रोजी प्रतिवादी क्र. २ तेथे उपस्थीत नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त मिळकत आम्ही प्रतिवादी क्र. २ यांचे चुलत भाऊ पांडुरंग यांना वहिवाटी कामी वाटयाने दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त मिळकत ही

आम्ही पांडुरंग याला कमी पैशात खरेदी देणार असल्याने तो वाटयाने करत आलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. २ ही मोहोळ येथे राहत असल्याने ती तेथून कधीमधी येवून वहिवाट करत असते. वादग्रस्त मिळकती मध्ये आम्ही तुर, ज्वारी, ऊसाची पिके घेत आहे. मी न्यायालयात घेतलेल्या पिका बाबतीत दस्त दाखल केलेले आहेत.

हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. २ हे दि. १५/११/२०२१ रोजी वादग्रस्त मिळकती मध्ये आलेली नव्हती व तिने कोणत्याही प्रकारची मोटार बंदकेलेली नव्हती. मी अदखलपात्र गुन्हेची नोंद केलेनंतर पोलिसांनी गैरअर्जदारांना बोलावून घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी पांडुरंग याला फुस लावून प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना मारहाण केली. हे मला माहिती नाही की, त्यांचेमधील प्रकरण करमाळा न्यायालयात चालु आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. २ यांचा वादग्रस्त मिळकती मध्ये कब्जा आहे व त्यापोटी त्यांना आम्ही नेहमी धमक्या देत असतो.

प्रश्न – प्रतिवादी क्र. २ रेश्मा ही जे क्षेत्र वहिवाटते ते तुमच्या खरेदी खतात दर्शिविलेल्या चतु:सिमेतील नाही.

उत्तर – खोटे आहे.

हे म्हणणे खरे नाही की, मी न्यायालयात खोटे पुराव्याचे शपथपत्र दाखल करुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>वादी साक्षीदार क्र.१ यांची उलटतपासणी प्रतिवादी क्र. ३ तर्फे वकील श्री. एम.बी.कांबळे यांचे तर्फे शपथेवर सुरु –</u>**

प्रतिवादी क्र. ३ व त्यांचे विधिज्ञांना वारंवार पुकारले असता गैरहजर, करिता उलटतपास नाही.

उलटतपास संपला, फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

(एस.एम.घुगे)
दि. १८–०७–२०२५ दिवाणी न्यायाधीश व.स्तर, करमाळा